# ॲग्रोमेट सल्लागार सेवा विभाग

## भारतीय हवामान खात्याने दि. 23 एप्रिल 2024 रोजी जारी केलेला पीक सल्ला पुढील 5 दिवसांसाठी छत्रपती संभाजीनगर.

**मका:**

मागील आठवड्यातील ढगाळ वातावरण व तापमानातील चढउतारामुळे मका पिकामध्ये लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असून याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ व शांत वातावरणात फवारणी करावी. फवारणी करत असताना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.

**डाळिंब:**

मागील आठवड्यातील ढगाळ व दमट वातावरणामुळे डाळिंब बागेमध्ये तेल्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असून याच्या व्यवस्थापनासाठी कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन ५ ग्रॅम किंवा ब्रॉनोपॉल ५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ वातावरणात फवारणी करावी. तसेच सध्यस्थितीत तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता डाळिंब बागेस पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी व बागेस गरजेनुसार पाणी व्यवस्थापन करावे तसेच बागेत पिकांचे अवशेष/गवताचे आच्छादनाचा वापर करावा.

**पशुधन:**

सध्यस्थितीत तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता शेतक-यांनी पशुधनाचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी दिवसा जनावरे झाडांच्या सावलीत बांधावीत. तसेच वाळलेल्या चा-यापेक्षा हिरव्या चा-यामध्ये २ ते ३ पट अधिक स्फुरदाचे प्रमाण असते. त्यामुळे शेतक-यांनी सद्यस्थितीत जनावरांच्या आहारात वाळलेल्या चा-यासोबत हिरव्या चा-याचा समावेश करावा. जेणेकरुन जनावरांमधील स्फुरदाचे प्रमाण योग्य राखले जाईल.

**पोल्ट्री:**

कोंबडयांच्या शेडमधील तापमान नियंत्रित करुन पाण्याच्या भांड्यांच्या संख्या वाढवावी व पीण्यासाठी स्वच्छ व थंड पाणी दयावे. तसेच उष्णतेपासून त्रास होऊ नये म्हणून कोंबड्याना खाद्य सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेत द्यावे.

**रेशीम:**

रेशीम कोष काढणीनंतर कोष वाळवून साठवून ठेवण्यासाठी कडक उन्हामध्ये पातळ सुती कपड्याचे आच्छादन करून वाळवावे. मुंग्यांच्या प्रादुर्भावापासून कोशाचे संरक्षण करावे.पाच दिवस कोष वाळल्यानंतर साठवणुकीच्या घरात व बारदाण्यावर डेल्टामेथ्रीन ४ मिली प्रति १० लिटर पाण्यत मिसळून फवारावे.